| | |
|---|---|
| MHSO070006802022 | <u>नियमित दरखास्त क्र. २८/२०२२ मधील निशाणी क्र. ३० खालील आदेश</u><br><u>(पारीत दिनांक ०७ मे २०२६)</u> |

१. धनको यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१ नियम १०१ प्रमाणे तसेच कलम १५१ प्रमाणे तहसिलदार पंढरपूर यांना महाराष्ट्र जमीन महसुल कायदा कलम १५५ प्रमाणे प्रतिवादी क्र.३ यांच्या नावाची नोंद ७/१२ उतारास घेण्यासंबंधी आदेशित करावे यासाठी दाखल केला आहे. ऋणको यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे सादर केलेला नाही. सबब, सदरचा अर्ज हा ऋणको यांच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात येतो. धनको यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

२. प्रस्तुत प्रकरणात निशाणी क्र.२७ प्रमाणे दावा मिळकतीचे खरेदीखत धनको यांच्या लाभात करुन देण्यासाठी सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय, पंढरपूर यांची नेमणुक न्यायालयीन आयुक्त म्हणुन करण्यात आली होती. परंतु, खरेदीखताचा दस्त नोंदविण्यासाठी दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात गेल्यावर सदरचा दस्त तांत्रीक त्रुटीमुळे नोंदणी होऊ शकलेला नाही. निशाणी क्र.२९ वर सह दुय्यम निबंधक, पंढरपूर क्र.२ यांचे दिनांक १३.०४.२०२६ रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. सदर पत्रानुसार मौजे पंढरपूर येथील सर्व्हे क्र.५१/५ च्या ७/१२ सदरी लिहून देणार दत्तात्रय नारायण सुर्यवंशी व कैलास नारायण सुर्यवंशी यांच्या नावाची नोंद दिसुन येते. परंतु, खरेदीखताच्या दस्तात लिहून देणार म्हणुन शांताराम नारायण सुर्यवंशी यांच्या नावाचा उल्लेख दिसतो परंतु, ते नांव ७/१२ सदरी नमुद नाही. केवळ ७/१२ सदरी मालकी हक्कात असणारी व खाते क्र.९९९ अन्वये असणारी नावेच ऑनलाईन E-mutation नुसार निवडण्यात येत असल्यामुळे व श्री.शांताराम नारायण सुर्यवंशी यांचे नांव ७/१२ सदरी नसल्यामुळे दस्ताची नोंद करण्यास तांत्रीक अडचण येत असल्याचे सह दुय्यम निबंधक यांनी कळविले आहे.

३. धनको यांनी दत्तात्रय सुर्यवंशी, कैलास सुर्यवंशी व शांताराम सुर्यवंशी यांचे विरुध्द साठेखतावरुन खरेदीखत करुन मिळण्यासाठी रे.मु.क्र.२७१/२०१८ हा दाखल केलेला होता. प्रतिवादींनी दिनांक १४.११.२००५ रोजी साठेखताचा दस्त धनको यांच्या लाभात लिहून दिलेला होता. सदर दाव्याचा निकाल होऊन प्रतिवादी यांनी धनको यांच्या लाभात खरेदीखताचा दस्त करुन दयावा असे आदेशित करण्यात आलेले आहे. दाव्यासोबत दाखल केलेल्या साठेखतामध्ये लिहून देणार म्हणुन या तीनही प्रतिवादींची नांवे नमुद केलेली होती. आजरोजी धनको यांनी निशाणी क्र.३२ सोबत दिनांक ११.०८.२००० रोजीचे खरेदीखत दाखल केलेले आहे. प्रस्तुत वादातील मिळकत म्हणजेच पंढरपूर येथील सर्व्हे क्र.५१/५ पैकी १ आर. जमीन ही तीनही प्रतिवादींनी माणिक दशरथ कोताळकर यांचेकडून या खरेदीखतान्वये खरेदी केली होती. त्याप्रमाणे फेरफार क्र.७०३५ ची नोंद करण्यात आली. सदरची नोंद दिनांक २५.०१.२००१ रोजी प्रमाणित करण्यात आली. सदर नोंदीप्रमाणे खरेदी घेणार म्हणुन दत्तात्रय, कैलास व शांताराम सुर्यवंशी यांच्या नावाची नोंद दिसुन येते. परंतु, ७/१२ सदरी फेरफार क्र.७०३५ अन्वये नोंद होताना केवळ दत्तात्रय व कैलास यांच्या नावाची नोंद झाल्याचे ७/१२ उतारावरुन स्पष्ट होते.

४. यावरुन असे दिसुन येते की, फेरफार क्र.७०३५ नोंद होताना दत्तात्रय सुर्यवंशी, कैलास सुर्यवंशी व शांताराम सुर्यवंशी यांची नांवे खरेदीदार म्हणुन नमुद करण्यात आलेली होती. परंतु, ७/१२ सदरी सदर नांवे नोंदवित असताना शांताराम सुर्यवंशी यांच्या नावाची नोंद केलेली दिसुन येत नाही. सबब, फेरफार क्र.७०३५ प्रमाणे फेरफारांची नोंदवही यातील नोंदी आणि ७/१२ पत्रकावरील नोंदी यामध्ये तफावत असल्याचे दिसुन येते. महसुल खात्याकडून फेरफाराप्रमाणे ७/१२ पत्रकी नोंद करत असताना त्रुटी राहिल्याने धनको यांना हुकुमनाम्याप्रमाणे खरेदीखत त्यांच्या लाभात करुन घेता येत नाही. याकारणास्तव न्यायालयाने पारीत केलेला हुकुमनामा निष्फळ ठरत आहे. हुकुमनाम्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी न्यायालय संबंधित यंत्रणा व विभाग यांना योग्य ते आदेश देऊ शकते. फेरफार क्र.७०३५ यावरील नावांची नोंद

आणि ७/१२ पत्रकात याच फेरफाराने नोंदविण्यात आलेल्या नावांची नोंद यामध्ये तफावर आढळुन येत असल्याने संबंधितांना आदेशित करणे आवश्यक ठरते. वर नमुद कारणास्तव खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. अर्ज (निशाणी क्र. ३०) मंजुर करण्यात येत आहे.

२. तहसिलदार, पंढरपूर यांना आदेशित करण्यात येते की, पंढरपूर येथील भुमापन क्र.५१/५ वरील फेरफार क्र.७०३५ अन्वये केलेल्या नावांची नोंद फेरपत्रकावरुन पुर्नतपासणी करुन सुधारीत करण्यात यावे आणि याअन्वये शांताराम नारायण सुर्यवंशी यांचे नांव ७/१२ पत्रकी समाविष्ठ करण्यात यावे.

३. तहसिलदार, पंढरपूर यांना आदेशित करण्यात येते की, आदेश क्र.२ च्या अंमलबजावणीसाठी संबंधित विभागांना योग्य ते आदेश देण्यात यावे तसेच त्याप्रमाणे सुधारीत ७/१२ तयार करण्यात यावे आणि पुर्तता अहवाल या न्यायालयात लवकरात लवकर सादर करावा.

SONALI SHASHIKANT RAUL

Digitally signed by SONALI SHASHIKANT RAUL
Date: 2026.05.07 16:11:08 +0530

**(एस.एस.राऊळ)**

**दिनांक – ०७.०५.२०२६.** **सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, पंढरपूर,**

**जि. सोलापूर.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | D.S.Landage, Stenographer (Grade-III) |
| Court Name | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) Pandharpur, Dist. Solapur. |
| Date | :- | 07.05.2026. |
| Order signed by the presiding officer on | :- | 07.05.2026. |
| Order uploaded on | :- | 07.05.2026. |